# ॥ वैद्या ॥

१९५५ च्या डिसेंबर महिन्याचा सुमार असावा. मीं नुकताच फ़र्ग्युसन कॉलेजांत दाखल झालों होतों. फ़र्ग्युसनचं वार्षिक गॅदरिंग चालूं होतं. कॉलेजच्या ग्राउंडवर पॅव्हिलियनला ज़ोडून भलाथोरला मांडव घातला ज़ाई, व त्या मांडवांत हें गॅदरिंग होत असे. गॅदरिंगला प्रेक्षक म्हणून ज़ाण्याचं मुख्य आकर्षण म्हणज़े व्यासपीठावर चाललेल्या घडामोडींवर टवाळ आणि अचकटविचकट शेरे मुक्तपणानं मारून हंशा पिकविण्याची संधि हें असे. त्याप्रमाणें मागल्या बाज़ूला बसून माझं कार्य चालूं होतं. शेज़ारीं गांवांत राहणारा (गांवांत म्हणजे मुठा नदीच्या दक्षिण बाज़ूच्या प्रदेशांत राहणारा) माझा एक शाळूसोबती. तोही माझ्याच ज़ातींतला -- म्हणज़े नंबरी टवाळ व नफ्फट. (अश्या कार्यक्रमांत शेज़ारीपाज़ारी कोण आहेत याला अपार महत्त्व असतं.) मजेंत वेळ चालला होता. (त्या काळांत आमचा मझा आम्हांला स्वतःलाच निर्माण करावा लागत असे.) लवकरच माझ्या लक्षांत आलं कीं माझ्या त्या मित्राच्या पलीकडल्या सीटवरून बऱ्यापैंकीं इरसाल शेरे येत आहेत. मीं हळूंच मित्राला विचारलं, 'कोण रे तो?'. मित्रानं रीतसर ओळख करून दिलीः 'अरे हा सुधाकर वैद्य. बुधवारांतला माझा मित्र.' पुढं असंही बाहेर पडलं कीं ही व्यक्ति एस् पी किंवा एम् ई एस् (म्हणज़े आताचं गरवारे कॉलेज) मधली आहे. मीं ज़रासा चरकलोंच. च्यायला, फ़र्ग्युसनशिवाय इतर ठिकाणींसुद्धां चतुर प्राणी असूं शकतात हें मला प्रथमच ज़ाणवत होतं ! परकॉलेजमधले आणि परपेठेंतले लोक आमच्या इकडे येऊन आमचीं कॉलेजं आणि आमच्या पेठा बिघडवताहेत असं कांहींसं मला त्या काळांतसुद्धां वाटत असावं. पण या व्यक्तीनं त्या गैरसमज़ाला चांगलाच तडा दिला. मीं आत्तां चुकून 'व्यक्ति' म्हटलं, पण खरं म्हणज़े ही शंभर नंबरी वल्लीच म्हणायला हवी.

या colourful सुधाकर वैद्याची आणि माझी दोस्ती व्हायला फारसा वेळ लागण्याचं कांहींच कारण नव्हतं. लवकरच त्यानं जाहीर केलं कीं त्याची आई व माझी आई या एकमेकींच्या दूरच्या बहिणी आहेत. मग 'मावशी मावशी' म्हणत दोघांचीही एकमेकांच्या घरीं हजेरी सुरूं. दोन्हीं मावश्या स्वयंपाकांत निष्णात. वैद्याकडे तर शिवाय त्याच्या दोन बहिणीसुद्धां. तेव्हां खाण्यापिण्याची चंगळ.

खाण्यावरून आठवलं, या सुधाकरचं खाणं गंमतीदार असतं. त्याला हरभऱ्याची ज़ुडी खातांना पहावा. आपण कसे एक घाटा ज़ुडीपासून तोडतों, तो घाटा सोलतों, आणि आंतला हरभरा तोंडांत टाकतों. हा सुधाकर, ते घाटे ज़ुडीपासून तोडीतच नाहीं, ज़ुडीवरच तो घाटा फोडून, आंतला हरभऱ्याचा दाणा डायरेक्ट् तोंडांत. सर्व कसं झटपट. आबा म्हणायचे 'हा बकरीसारखा खातो.' (म्हणजे, बकरी खाते, त्याप्रमाणें.) त्याला काकडी खातांनासुद्धां पहाण्यासारखं असतं; अशी काकडी तोंडासमोर धरायची, आणि चावत चावत चावत चावत ती झट्कन् तोंडांत लुप्तच होते. असं त्याचं खाणं.

दोन्हीं घरीं हार्मोनियम होते, सुधाकरचे वडील तबलाही वाज़वीत. आणि मुख्य म्हणजे दोन्हीं घरच्या सर्वच मंडळींना संगीताची सज्जड़ 'लागण'. त्यामुळं त्याच्या घरीं आमच्या अनेक मैफ़िली होत. मींसुद्धां त्याच्या घरीं भरपूर गाणीं म्हणून घेतलीं आहेत.

आतां, सिनेमातंतलीं गाणीं, मराठी भावगीतं वगैरे सगळेच़ गातात (किंवा गात असत). पण या वैद्याचं गाणं कसं? तो सर्व गाणीं अधल्यामधल्या ऑर्केस्ट्रल् पीसेस् , संभाषणांसकट म्हणतो. उदाहरणार्थ, पुढें आम्हीं दोघेही बडौद्याला शिकत असतांना 'दिल अपना और प्रीत परायी' नामक एक सिनेमा खूपच़ प्रसिद्ध झाला होता. (आम्हीं बडौद्यांत असंख्य सिनेमे पाहिले. खरं तर सिनेमे पाहाणें, सायकलवरून चौफेर भटकणें, न्यायमंदिराज़वळच्या लस्सीवाल्याकडे ज़ाऊन वेळींअवेळीं लस्सी पिणें, आणि दांडियाबाज़ारांतल्या, वैद्याच्या खोलीवर, आठदहा पोरांनीं मिळून ब्रेड, लोणी आणि चहा च़ापणें हीं आमचीं बडौद्यांत असतांनाचीं प्रमुख कामं होतीं. चहा-ब्रेड-लोणी कार्यक्रमाला आम्हीं 'चब्रेलो' असं सांकेतिक नांव दिलं होतं.) तर हा 'दिल अपना और प्रीत परायी' नामक सिनेमा. मीनाकुमारी, राजकुमार. शंकर जयकिशनचं संगीत. त्या सिनेमांतलं प्रसिद्ध गाणं [दिल अपना और प्रीत परायी, किसने है ये रीत बनायी] तुम्हीं ऐकलंही असेल. त्या सिनेमांत तें गाणं सुरूं होण्याआधीं संध्याकाळच्या अंधाऱ्या वेळीं फटाके, रंगीत अग्निबाण वगैरे आतिषबाज़ी दाखविली आहे. (सिनेमा ब्लॅक्-अँड्-व्हाईट होता, पण आमच्या डोळ्यांना रंगही दिसायचे.) तर हा तें गाणं कसं म्हणतो? तर त्या फटाक्यांपासूनच़ सुरुवात करतो -- [बूम्, ठ्याँ, ढीश्,... टण् टणणण टण् ट टटण् ... दिल अपना और इ.इ.] असं. घरदार दणाणून सोडणारं गाणं.

असं या प्राण्याचं खाणंही और, गाणंही और. माझी आई तर याच्या च़ालण्याचीसुद्धां नक्कल करून आम्हांला हंसवीत असे.

कसे कोण ज़ाणें, आम्हीं आपापल्या परीक्षा पास झालों, आणि बडौद्यांतलं आमचं 'शिक्षण' संपवून पुण्याला परतलों. मीं के पी सी मधें च़ाकरीला लागलों, तर यानं आपल्या दोन आर्किटेक्ट् मित्रांसमवेत 'Trio Architects' या नांवाखालीं स्वतःचा धंदा सुरूं केला. लक्ष्मीरस्त्यावरच्या त्यांच्या ऑफ़िसमध्यें (ते busy नसतांना) आम्हीं बराच़ वेळ च़काट्या पिटल्या आहेत. अमृततुल्य चहा प्याला आहे.

माझे वडील पुण्यांतले आर्किटेक्ट्, तेव्हां सुधाकर स्वतः आर्किटेक्ट् झाल्यावर त्याचे व माझ्या वडिलांचे संबंध आणखीच़ दृढ झाले. पुढें अनेक वर्षं मीं पुण्याबाहेर गेल्यावर तर मला वाटतं आबांनीं याला ऑनररी दत्तकच़ घेतला कीं काय असं वाटण्याएवढी दोघांची गट्टी. इतकी, कीं माझं लग्न झाल्यानंतर जेव्हां जयानं हळूंच़ माझ्या आईला विचारलं कीं 'हे कोण हो?', तेव्हां आईचं उत्तर 'अगं, हा आमचा वैद्या; ह्यांचा मित्र. आतां मुकुंदाशींसुद्धां त्याची च़ांगली ओळख झाली आहे.' असं आलं होतं.

पुढं एकदां मीं सुट्टींत पुण्याला आलों असतांना वैद्यानं 'माझ्या घरीं चहाला कधीं येतोस' असं विचारलं होतं; मीं लगेच़ माझं 'स्केज्यूल' बाहेर काढलं ('शेड्यूल' नाहीं, 'स्केज्यूल' बरं का. आम्हीं अमेरिकन नां!). तर मीं तो कागद हातांत घेऊन वैद्याला 'कधीं वेळ देतां येईल' याचा विचार करायला लागणार, तेवढ्यांत यानं तो माझा 'स्केज्यूल'चा कागद हातांत घेतला, आणि त्याच्या चिंध्या करून देऊन, मला क्षणार्धांत ज़मिनीवर आणलं होतं.

'सुधाकर दिनकर वैद्य' असं खरं नांव; तो स्वतः 'वैद्य एस् डी' असं सांगतो. पण कां कोण ज़ाणे, आमच्या घरीं मात्र त्याचं केवळ 'वैद्या' असंच़ नांव आहे. म्हणजे आमच्या घरांत त्याच्या नांवाचं प्रथमेच्या एकवचनाचं रूपच़ मुळीं संबोधनासारखं 'वैद्या' असं झालं आहे. जयासुद्धां हें त्याचं नांव केव्हांच़ शिकली आहे.

अतिशय रंजक असा हा माझा दोस्त; कायम हंसत आणि हंसवत असतो. तो आला कीं घर कसं दणाणत असतं; जिवंत असतं. बऱ्याच दिवसांत मनमुराद हंसायचा प्रसंग आला नसला तर सरळ वैद्याकडे ज़ावं, काम फत्ते. त्याच्या घरच्या सर्वांच्याच अंगांत हा गुण दिसतोय्.

सुख हें आपल्या स्वतःच्या आंतच pre-installed असतं; त्याच्यासाठीं जगाला वळसा मारण्याची ज़रूरत नसते; आणि तें दोन्हीं हातांनीं चौफेर वांटण्यासाठीं असतं; हें मीं माझ्या आईवडिलांज़वळ तर शिकलोंच, पण आमच्या वैद्यानंसुद्धां या माझ्या 'शिक्षणाला' महत्त्वाचा हातभार लावलेला आहे. आणि अज़ून माझं हें 'शिक्षण' चालूंच आहे.

असा दोस्त मिळायला भाग्य लागतं. आणि तें भाग्य माझ्याकडे आहे.